# वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांचे कार्यालय, वाशिम

जावक क्र. १९४४
जिल्हा न्यायालय, वाशिम
दिनांक ११/६/२४

## जाहीर प्रकटन

**विषय:—** साहित्य खरेदी करण्याकरिता दरपत्रक मागविणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, वाशिम येथे कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेले साहित्य खालील प्रमाणात खरेदी करणेकरिता त्याखाली नमुद असलेल्या अटी व शर्तीवर दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | आवश्यक नग |
|---|---|---|
| १ | झेरॉक्स कागद A4 साईझ (जे. के. ७० gsm) | १०० रिम |
| २ | गम बॉटल (200 ml) | ३० नग |
| ३ | स्टॅपलर पिन (१० नं) | २ बॉक्स |
| ४ | टॅग | ५० बंडल |
| ५ | लिफाफे (11" x 5") | १००० नग |
| ६ | सेलोटेप ( 2", 50 meter) | २० नग |
| ७ | कोलिन (500 ml) | ६ नग |
| ८ | लाख | १० बॉक्स |

१. खरेदी केलेल्या साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यापासुन ७ दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील.

३. खरेदी केलेल्या साहित्याचा पुरवठा जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करणे बंधनकारक राहील.

२. खरेदी करण्यात आलेल्या साहित्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास सदरहु साहित्य तात्काळ बदलवुन देणे अनिवार्य राहील.

४. खरेदी केलेल्या साहित्याच्या देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पध्दतीद्वारे सरळ अदात्याचे बॅंक खात्यात जमा करण्यात येईल.

५. खरेदी करण्यात येणारे साहित्य उपरोक्त प्रमाणे नमुद असलेल्या आकार, प्रमाण व नगात असणे आवश्यक आहे.

६. मेलव्दारे तसेच बंद लिफाफ्यामध्ये नसलेले दरपत्रक खरेदी प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात येणार नाही

दरपत्रक धारकाने उपरोक्त साहित्याच्या खरेदीकरिता आपले दरपत्रक सर्व किंमती, कर, सुट व अटींसह दिनांक २५/०६/२०२४ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांचे नावे या कार्यालयास बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफ्यावर **'साहित्य खरेदी'** असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांना राहील.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, वाशिम

दिनांक १०/०६/२०२४

प्रति,

१. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, वाशिम (जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी)

२. अधिक्षक (वित्त व प्रशासन) जिल्हा न्यायालय, वाशिम (नोटीस बोर्डवर लावणेसाठी)

३. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) मालेगाव/मानोरा/मंगरूळपीर/कारंजा/रिसोड(नोटीस बोर्डवर लावणेसाठी)— मेलद्वारे